2

Add

MISC-0491

माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, शारिरीकदृष्टया अपंग, स्वातंत्र्य सैनिक व संपकालीन कर्मचारी यांना शासकीय सेवेत वर्ग ३ व वर्ग ४ च्या आरक्षित पदावर तसेच पसंती क्रमाने देण्यात येणा-या नियुक्तीबाबत अंमलबजावणी योग्य रितीने व काटेकोरपणे करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्र.आरटीए-१०८८/१३५६/सीआर-२७/८९/१६-अ,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : ४ डिसेंबर १९९०.

वाचा : शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.आरटीए-१०८८/१३५६/१६-अ, दिनांक २१ डिसेंबर १९८८.

परिपत्रक :

प्रकल्पग्रस्त व्यक्ती, माजी सैनिक, शारीरिकदृष्टया अपंग, स्वातंत्र्य सैनिक, संपकालीन कर्मचारी, जनगणना कर्मचारी यांना वर्ग ३ व वर्ग ४ च्या पदावर आरक्षण/पसंती क्रमानुसार नेमणुका देण्यात येतात किंवा काय ह्यावर जातीने लक्ष ठेवण्याबाबत तसेच अनुशेष भरण्या संबंधात अंमलबजावणी योग्य व रितीने व काटेकोरपणे करण्याबाबत सूचना, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.आरटीए-१०८८/१३५६/१६-अ, दिनांक २१ डिसेंबर १९८८ नुसार देण्यात आल्या आहेत. ह्या सूचना त्यात दर्शविलेल्या आरक्षण/पसंती क्रमाबाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी व योग्य प्रकारे व तत्परतेने व्हावी ह्या दृष्टीने दिलेल्या आहेत. सदर विविध गटातील सेवा भरतीबाबतची कार्यवाही वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसारच करावयाची आहे याकडे लक्ष वेधण्यात येते.

उक्त दिनांक २१.१२.१९८८ च्या परिपत्रकामध्ये भरतीच्या माध्यमासंबंधी दिलेल्या तपशीलात पुरेशा माहिती अभावी काही गैरसमज व तक्रारी उदभवल्या होत्या, त्या संबंधात विचार करुन आता असे स्पष्ट करण्यात येते की, त्या परिपत्रकातील "भरतीचे माध्यम" या स्तंभातील मजकूर वगळावा व भरतीच्या माध्यमासंबंधात अस्तित्वात असलेल्या शासकीय आदेशातील तरतुदीचे पालन करुन कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल, यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त शारिरीक दृष्ट्या अपंग, स्वातंत्र्य सैनिक व अंशकालीन कर्मचारी यांना शासकीय सेवेत वर्ग-३ व वर्ग-४ च्या आरक्षित पदावर तसेच पसंती क्रमाने देण्यात येणा-या नियुक्तीबाबत अंमलबजावणी योग्य रितीने व काटेकोरपणे करण्याबाबत या विषयावरील सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक. आरटीजे-१०८८/१३५५/सीआर-२७/८९/१६-अ, दिनांक १.१२.९० ची प्रत.

क्रमांक. एचडीओ-१०९०/५२९३/एचडीओ-७,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ३१ डिसेंबर १९९०

प्रत,

अवर सचिव (आस्थापना), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कार्यासन अधिकारी/प्रशासकीय कार्यासन अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रशासकीय कार्यासनांचे पर्यवेक्षक अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
गृह विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख.

यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर अग्रेषित.

(सही)
( सुं. म. कारंणी )
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन